दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. १२ एप्रिल, २०२६ | ■ वर्ष - १ ■ अंक - १९७ ■ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

रविवार दि. १२ एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, कृष्णपक्ष, दशमी रात्री १-१७ पर्यंत, दिवस नक्षत्र– श्रवण दुपारी ३-१४ पर्यंत नंतर धनिष्ठा
चंद्र रास- मकर रात्री ३-४५ पर्यंत नंतर कुंभ, सूर्य रास - मीन, गुरु रास - मिथुन

### उष्णतेचा पारा ३८ वर

**पुणे**: हवामान बदलामुळे तीन ते चार दिवसांपासून ३४ ते ३५ अंशावर असलेला उष्णतेचा पारा शुक्रवारी (दि. १०) ३८ अंशावर पोहचला. गेल्या २४ तासांत कमाल तापमानात दोन ते अडीच अंशाने तापमानात वाढ झाल्यामुळे शुक्रवारी दुपारनंतर उन्हाचा चांगलाच चटका जाणवत होता. कोरेगाव पार्क येथे सर्वाधिक ३८.१ तर शिवाजीनगर, हडपसर आणि वडगावशेरी येथे पारा ३६ अंशाच्या पुढे नोंदविला आहे. अवकाळीच्या विश्रांतीनंतर कमाल तापमान पुन्हा चाळीशी गाठेल, अशी शक्यता होती.

## सारांश वृत्त

### राजधानी दिल्लीच्या तापमानात वाढ

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान खात्याने (आयएमडी) येत्या काही दिवसांत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली असून राष्ट्रीय राजधानीत शनिवारी तापमानात वाढ होत आहे. शहराच्या हवामानाचे प्रतिनिधी सफदरजंग येथे कमाल तापमान ३४.७ अंश सेल्सिअस नोंदले गेले, जे सामान्यपेक्षा १.४ अंश कमी आणि आदल्या दिवसापेक्षा १.९ अंश जास्त आहे. किमान तापमान १८.६ अंश सेल्सिअस नोंदले गेले.

### शालेय वाहतुकीचे नियम कडक करणार

**ठाणे** : राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षा, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी राज्य सरकार शालेय वाहतुकीसाठी अधिक कडक नियम लागू करणार आहे, अशी माहिती राज्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दिली. राज्य सरकारने 'महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बस नियमन) (पहिली सुधारणा) नियम, २०२६' साठी मसुदा अधिसूचना जारी केली असून जनतेकडून १५ दिवसांच्या आत हरकती व सूचना मागविल्या आहेत. सरकार शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, अधिक पारदर्शक आणि अधिक जबाबदार बनविण्यासाठी कटिबद्ध आहे, असे परिवहन मंत्री म्हणाले.

### माकपने कन्नूरमध्ये हिंसाचार घडवला

**तिरुवनंतपुरम** : ९ एप्रिल रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर माकपने कन्नूर या राजकीयदृष्ट्या अस्थिर उत्तर जिल्ह्यात "व्यापक हिंसाचार" घडवून आणल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व्ही. डी. सतीसन यांनी शनिवारी केला. सत्ताधारी पक्षाला मोठा तोटा सहन करावा लागणार आहे, असा दावाही त्यांनी केला.

### इराणची पहिल्या फेरीत बाजी; गोठवलेली मालमत्ता मुक्त होणार

# अमेरिका-इराण युद्धविराम चर्चा सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद** : पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानच्या मध्यस्थीने सुरू असलेल्या चर्चेला नवा कलाटणी मिळाल्याचे संकेत आहेत. चर्चेच्या सुरुवातीलाच इराणने मोठी राजनैतिक बाजी मारल्याची चर्चा असून, अमेरिकेने इराणची गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्यास तत्त्वतः सहमती दर्शवल्याची माहिती पुढे आली आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, कतार आणि इतर विदेशी बँकांमध्ये अडकलेले सुमारे ६ अब्ज डॉलर (सुमारे ५० हजार कोटी रुपये) मुक्त करण्यास अमेरिका तयार झाल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या चर्चेला निर्णायक वळण मिळाले असून, हा या संघर्षातील महत्त्वाचा 'टर्निंग पॉईंट' ठरू शकतो, असे मानले जात आहे. ही चर्चा प्रामुख्याने हॉर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यावर आणि जागतिक तेलपुरवठा सुरळीत करण्यावर केंद्रित आहे. सध्या या सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाल्याने जगातील सुमारे २० टक्के तेलपुरवठा प्रभावित झाला आहे, ज्याचा थेट परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर होत आहे.




इराणवर १९७९ पासून विविध प्रकारचे अमेरिकन निर्बंध लागू आहेत. तेल निर्यातीवर बंदी, जागतिक बँकिंग प्रणाली (स्विफ्ट) मधून बहिष्कार, लष्करी व तंत्रज्ञान आयातीवरील निर्बंध आणि परदेशातील मालमत्ता गोठवणे अशा अनेक मर्यादांमुळे इराणची अर्थव्यवस्था दीर्घकाळ दबावाखाली आहे. २०१६-१७ दरम्यान अल्पकाळासाठी काही सवलती मिळाल्या होत्या, मात्र त्यानंतर निर्बंध पुन्हा कडक करण्यात आले.

या पार्श्वभूमीवर ६ अब्ज डॉलरची मुक्तता ही इराणसाठी मोठा दिलासा ठरू शकते. या निधीचा वापर अन्न, औषधे आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी होण्याची शक्यता आहे. तसेच, चर्चेला यश मिळाल्यास इराणला मर्यादित प्रमाणात तेल निर्यात करण्याची मुभा मिळू शकते आणि काही बँकिंग व्यवहारांवरील निर्बंध शिथिल होण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष चर्चेत अमेरिका आणि इराण दोन्ही बाजूंनी काही प्रमाणात लवचिक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

तज्ज्ञांच्या मते, या निधीमुळे इराणच्या घसरलेल्या चलनाला आधार मिळेल, महागाई कमी होण्यास मदत होईल आणि अलीकडील हवाई हल्ल्यांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी संसाधने उपलब्ध होतील. यामुळे इराणमधील सत्ताधारी व्यवस्थेला राजकीय आणि सामाजिक पातळीवरही बळ मिळू शकते. अमेरिका–इराण चर्चेत झालेली ही प्रगती केवळ द्विपक्षीय संबंधांपुरती मर्यादित नसून जागतिक ऊर्जा बाजार, मध्यपूर्वेतील सामरिक संतुलन आणि आंतरराष्ट्रीय राजकारणावर दूरगामी परिणाम करणारी ठरण्याची शक्यता आहे.

# मंत्री छगन भुजबळ यांचा अपघात टळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या दौऱ्यादरम्यान पुरंदर तालुक्यात धक्कादायक प्रकार घडला. खानवडी येथे कार्यक्रमासाठी येत असताना त्यांच्या हेलिकॉप्टरने नियोजित हेलिपॅडऐवजी थेट वाहनांच्या पार्किंगमध्ये उतरायचा प्रयत्न केल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त खानवडी येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी भुजबळ हेलिकॉप्टरने येणार असल्याने प्रशासनाने सर्व निकष पाळून सुरक्षित हेलिपॅडची व्यवस्था केली होती. हेलिकॉप्टर खानवडी परिसरात पोहोचल्यानंतर पायलटने खाली उतरण्यासाठी जागा शोधण्यास सुरुवात केली. यावेळी त्याला कार पार्किंगची मोकळी जागा दिसली आणि त्याने तीच हेलिपॅड असल्याचा समज करून हेलिकॉप्टर खाली आणण्यास सुरुवात केली. पार्किंगमध्ये हेलिकॉप्टर उतरत असल्याचे पाहून तेथे तैनात पोलिसांची धावपळ उडाली. हेलिकॉप्टरचे चाक पार्किंगमध्ये टेकताच पोलिसांनी तात्काळ पायलटला सावध केले आणि ही जागा अधिकृत हेलिपॅड नसल्याचे स्पष्ट केले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.

आपली चूक लक्षात येताच पायलटने तत्काळ हेलिकॉप्टर पुन्हा हवेत उचलले आणि काही अंतरावरील नियोजित हेलिपॅडवर सुरक्षित लँडिंग केले. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मालमत्तेचे नुकसान झाले नसले तरी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

# अंगणवाडी सेविका-मदतनीस भरतीला मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील महिला सक्षमीकरणाला चालना देणारा महत्त्वाचा निर्णय घेत सरकारने अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदांच्या मोठ्या भरतीला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर नियमित पदभरती होत असून, ८६६९ पदे भरण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. यासोबतच काही पदे रद्द करून १६५ नवीन पदांची निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती अदिती तटकरे यांनी दिली.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत या भरतीचा मोठा भाग राबविण्यात येणार आहे. या योजनेत १,१०,६६४ अंगणवाडी सेविका आणि १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस अशी एकूण २,२१,३२८ मानधनाधारित पदे मंजूर करण्यात आली आहेत. याशिवाय २८४३ पदे बाह्य यंत्रणेमार्फत भरण्यालाही मंजुरी देण्यात आली आहे.

या भरतीमुळे राज्यातील महिला वर्गाला मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार असून, विशेषतः ग्रामीण भागातील महिलांसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या बालकांच्या पोषण, आरोग्य आणि प्राथमिक शिक्षणाशी थेट संबंधित असल्याने या भरतीचा सकारात्मक परिणाम बालविकास सेवांवरही होणार आहे.

### खानवडीत 'ज्योती-सावित्री' शाळेचे लोकार्पण, कौशल्य केंद्रांची घोषणा

# महिला आरक्षण हा फुले विचारांचा वारसा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुरंदर** : महिलांना लोकसभा आणि विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय हा महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्त्री-शिक्षण आणि महिला सक्षमीकरणाच्या विचारांना साजेसा असून त्यांना दिलेली आदरांजली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त खानवडी येथे उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळे'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



या कार्यक्रमाला छगन भुजबळ, जयकुमार गोरे, चंद्रकांत पाटील, दादाजी भुसे, दत्तात्रय भरणे, अतुल सावे, मंगलप्रभात लोढा, अदिती तटकरे आणि योगेश कदम यांसह अनेक मंत्री व मान्यवर उपस्थित होते. फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महिला आरक्षणाच्या निर्णयाचा उल्लेख करत, तो समाजपरिवर्तनाच्या फुले-शाहू-आंबेडकर परंपरेशी सुसंगत असल्याचे नमूद केले.

मुख्यमंत्री म्हणाले की, महात्मा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा ही द्विशताब्दी वर्षाची सर्वात अर्थपूर्ण सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवर आधारित इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण देण्याचा हा ऐतिहासिक टप्पा आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच सुविधा उपलब्ध करून देत जागतिक स्तरावर स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. शाळेत आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल वर्गखोल्या आणि बहुभाषिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी फ्रेंच आणि जर्मनसारख्या परकीय भाषा आत्मसात केल्या असून, काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासा सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांपर्यंत पोहोचल्याचे उदाहरण देत त्यांनी ग्रामीण शिक्षणातील सकारात्मक बदल अधोरेखित केले. या शाळेच्या उभारणीत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराचा उल्लेख करत, त्यांनी प्रत्येक टप्प्यावर लक्ष घालून प्रकल्प साकार केला असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. ग्रामीण शिक्षणाला आधुनिकतेची जोड देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प मार्गदर्शक ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासावरही सरकारचा विशेष भर असल्याचे सांगत फडणवीस यांनी मोठी घोषणा केली. 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत जिल्हा परिषदेकडून अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी उपलब्ध होत आहे. याच धर्तीवर महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रांची उभारणी करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

### मेटे साहेबांचे अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे स्वप्न पूर्ण व्हावे ही अपेक्षा

# सुनेत्राताईंना शिवसंग्रामचा पाठिंबा - डॉ. ज्योतीताई मेटे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत असून या निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार उभ्या असून शिवसंग्राम या संघटनेचा सुनेत्राताई पवार यांना आज पत्रकार परिषदेमध्ये शिवसंग्रामच्या नेत्या डॉक्टर ज्योतीताई मेटे यांनी पाठिंबा जाहीर केला.

पुणे येथील पत्रकार भवन या ठिकाणी शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी पत्रकार परिषद घेत बारामती पोटनिवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना पाठिंबा देत असून, ज्याप्रमाणे स्व. विनायकराव मेटे, स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व. अजित पवार, स्व. विलासराव देशमुख, स्व. आर. आर. पाटील आणि शरद पवार यांनी जसा सलोखा जपला त्याचप्रमाणे आम्हीही शिवसंग्राम पक्षाच्या वतीने प्रेम व सलोखा राखून उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांना पाठिंबा देत आहोत, अशी भूमिका शिवसंग्राम पक्षाच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांनी घेतली.



शिवसंग्रामचे नेते स्व. विनायकराव मेटे यांनी अरबी समुद्रामध्ये शिवस्मारक व्हावे, हे आपल्या डोळ्यांसमोर व्हावे अशी आग्रही भूमिका घेतली होती. त्यांना शिवस्मारकाच्या समितीमध्ये अध्यक्षपद दिले होते. मात्र त्यांच्या निधनानंतर शिवस्मारकाचा प्रश्न मागे राहिला. आता महायुतीचे सरकार हे स्वप्न पूर्ण करेल, असा विश्वास डॉक्टर ज्योती मेटे यांनी व्यक्त केला. पाठिंबा देण्यामागे कोणतीही भूमिका नसल्याचे स्पष्ट करताना महाराष्ट्राची परंपरा आपण जपत आहोत, असा उल्लेख त्यांनी आवर्जून केला. या पत्रकार परिषदेला शिवसंग्रामचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.

### अवकाळीनंतर राज्यात उष्णतेची लाट

**मुंबई** : गेल्या काही दिवसांत अवकाळी पावसाने राज्यभरात धुमाकूळ घातल्यानंतर आता तापमानात झपाट्याने वाढ होत असून उकाडा जाणवू लागला आहे. मुंबई, पुणे आणि ठाणे परिसरात उन्हाचे चटके तीव्र होत असून दिवसभर ऊन-सावलीचा खेळ आणि संध्याकाळी गारवा अशा बदलत्या हवामानामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हवामान विभागाने कोकण पट्ट्यासाठी उष्ण व दमट हवामानाचा इशारा देत यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबईत पुढील पाच दिवस तापमानात वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तर राज्यातील इतर भागांतही उष्णतेचा तडाखा वाढण्याचा अंदाज आहे.

# आरटीई प्रवेश लॉटरी जाहीर

### १.०५ लाख विद्यार्थ्यांची निवड, २० एप्रिलपर्यंत प्रवेश प्रक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) राज्यातील खासगी शाळांतील २५ टक्के राखीव जागांसाठी काढण्यात आलेल्या लॉटरीचा निकाल जाहीर झाला असून, १ लाख ५ हजार ५८२ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी ही माहिती दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये १ लाख ५ हजार २२९ विद्यार्थी सर्वसाधारण गटातील, तर ५८२ विद्यार्थी दिव्यांग गटातील आहेत. या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया २० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

यंदा राज्यातील ८ हजार ७०१ शाळांमधील एकूण १ लाख १४ हजार २८५ जागा उपलब्ध होत्या. या जागांसाठी तब्बल २ लाख ८९ हजार ३८५ अर्ज प्राप्त झाले होते. जागांच्या तुलनेत अर्जांची संख्या अधिक असल्याने ६ एप्रिल रोजी संगणकीकृत लॉटरी काढण्यात आली. लॉटरीत निवड न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ८६ हजार ३४ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे माहिती दिली जाणार आहे. मात्र, केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता अधिकृत संकेतस्थळावर जाऊन निकाल तपासण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

दरम्यान, प्रवेश निश्चित करण्यासाठी कागदपत्रांची पडताळणी अनिवार्य करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा प्रशासन अधिकाऱ्यांकडे जाऊन पडताळणी समितीकडून कागदपत्रांची तपासणी करून घ्यावी लागणार आहे. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेशासाठी ऑनलाइन प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले जाईल.

### सिव्हिल कोर्ट ठरणार मुख्य जंक्शन, चाकणपर्यंत विस्ताराची तयारी

# पुणे मेट्रोच्या विस्तारीकरणाचा वेग वाढला..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरातील सार्वजनिक वाहतुकीत मोठा बदल घडवणाऱ्या मेट्रो प्रकल्पामुळे पुणेकरांचा प्रवास अधिक सोपा, जलद आणि सुटसुटीत होण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली जात आहेत. मेट्रो सेवेला मिळत असलेल्या प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर विस्तारीकरणाचा वेग वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे मेट्रोच्या आराखड्यातील सर्वात महत्त्वाची घोषणा म्हणजे सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशनला मध्यवर्ती जंक्शन म्हणून विकसित करण्याचा निर्णय. या ठिकाणी मेट्रोच्या तिन्ही लाईन्स एकत्र येणार असल्याने प्रवाशांना एका ठिकाणी सहजपणे लाईन बदलता येणार आहे. यामुळे शहराच्या कोणत्याही कोपऱ्यात जाणे अधिक सुलभ होणार आहे.



यासोबतच तिन्ही मार्गांवर प्रवासासाठी एकच क्यूआर कोड आधारित तिकीट लागू करण्याचे नियोजन सुरू आहे. ही सुविधा सुरू झाल्यानंतर प्रवाशांना वारंवार तिकीट काढण्याची गरज राहणार नाही, ज्यामुळे प्रवास अधिक सोयीस्कर होईल.

मेट्रो जाळ्याच्या विस्तारासाठी विविध प्रकल्पांना गती देण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील भक्ती शक्ती चौकापर्यंतच्या मार्गाचे काम सुरू असून ते डिसेंबर २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच स्वारगेट ते कात्रज या दक्षिण विस्ताराचा प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे. वनाज ते चांदणी चौक या मार्गाचे कामही पुढील तीन ते चार वर्षांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या सर्व प्रकल्पांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून प्रत्यक्ष कामांना वेग देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, मेट्रोचा विस्तार आता शहराबाहेरील औद्योगिक भागांपर्यंत करण्याची तयारी सुरू आहे. चाकणपर्यंत मेट्रो नेण्याचा प्रस्ताव विचाराधीन असून, पीएमआरडीएच्या सहकार्याने हा प्रकल्प पुढे नेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या निर्णयामुळे औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या हजारो कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मेट्रो सेवेला पुणेकरांनी दिलेला प्रतिसादही लक्षणीय आहे. २०२५-२६ या वर्षात सुमारे ७ कोटी ८ लाख प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला आहे. दररोज सरासरी दोन लाख प्रवासी मेट्रोने प्रवास करत असून, ही संख्या तीन लाखांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. वनाज ते रामवाडी या मार्गावर सर्वाधिक म्हणजे सुमारे ६० टक्के प्रवासी वाहतूक होत असल्याचेही स्पष्ट झाले आहे. डिजिटल तिकीट व्यवस्थेलाही मोठा प्रतिसाद मिळत असून, सुमारे २५ टक्के प्रवासी व्हॉट्सॲपच्या माध्यमातून तिकीट काढत आहेत. यावरून पुणेकरांची आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारीही दिसून येते. शहराच्या चारही दिशांना विस्तारत असलेले मेट्रो जाळे वाहतूक कोंडी कमी करण्यास, प्रवासाचा वेळ वाचवण्यास आणि पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना देण्यास महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. पुण्याच्या विकासात मेट्रो हा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# त्या ३ पोलिसांवर निलंबनाची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शहरातील पोलीस दलात धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, "रील स्टार" म्हणून ओळखली जाणारी पोलीस कर्मचारी सोनाली हिंगे हिच्यासह तिघा पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नामांकित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना ब्लॅकमेल करून ७ लाख रुपयांची खंडणी उकळल्याचा गंभीर आरोप या तिघांवर आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अजित बडे (सायबर पोलीस ठाणे), पोलीस शिपाई सुदाम तायडे आणि दामिनी पथकातील सोनाली हिंगे यांचा समावेश आहे. कर्तव्यातील हलगर्जीपणा आणि बेजबाबदार वर्तन यामुळे तिघांना निलंबित करण्यात आले असून, विभागीय चौकशी पूर्ण होईपर्यंत ही कारवाई कायम राहणार आहे.

या प्रकरणाची सुरुवात एका अल्पवयीन विद्यार्थिनीच्या तक्रारीपासून झाली. संबंधित विद्यार्थिनीने काही कागदपत्रांच्या संदर्भात मदतीसाठी पोलिसांकडे धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणाचा गैरफायदा घेत संबंधित पोलिसांनी विद्यार्थिनीला सोबत घेऊन महाविद्यालयाच्या प्राचार्यांना जाब विचारला. त्यानंतर विद्यार्थिनीच्या माध्यमातून प्राचार्यांवर छळाचे आरोप करण्यास भाग पाडण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे. या तक्रारीचा धाक दाखवत पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची धमकी देत तिघांनी १० लाखांची मागणी केली. भीतीपोटी प्राचार्यांनी ७ लाख रुपये दिल्याचे निष्पन्न झाले असून, ही रक्कम आरोपी पोलिसांनी आपसात वाटून घेतल्याचेही समोर आले आहे.

## संपादकीय

### जनहित याचिका: न्यायाचे शस्त्र की प्रसिद्धीचे व्यासपीठ?




**जनहित याचिका ही भारतीय न्यायव्यवस्थेची मोठी देणगी मानली जाते. पण गेल्या काही वर्षांत तिचा वापर जितका वाढला, तितकाच तिचा गैरवापरही उघड झाला. त्यामुळे प्रश्न तिच्या अस्तित्वाचा नाही; तर तिच्या वापराच्या प्रामाणिकतेचा अधिक गंभीर बनला आहे.**

भारतीय न्यायव्यवस्थेतील जनहित याचिका ही केवळ कायदेशीर संकल्पना नाही; ती न्यायाच्या सामाजिक विस्ताराची खूण आहे. १९८०च्या दशकात न्यायालयांनी 'लोकस स्टँडी'ची पारंपरिक अट शिथिल करत सामान्य नागरिकालाही न्यायालयाचे दार उघडले. न्यायमूर्ती पी. एन. भगवती आणि व्ही. आर. कृष्ण अय्यर यांनी या संकल्पनेला दिलेले रूप हे भारतीय न्यायव्यवस्थेतील क्रांतिकारी वळण ठरले. न्याय हा केवळ सक्षमांसाठी नसून वंचितांसाठीही आहे, हा संदेश या प्रक्रियेतून दिला गेला. या यंत्रणेने अनेक महत्त्वाचे निर्णय घडवले. कारागृहातील कैद्यांचे हक्क, बालमजुरी, पर्यावरण संरक्षण अशा विषयांवर न्यायालयांनी पुढाकार घेतला. राज्यकर्ते किंवा प्रशासन अपयशी ठरले, तेव्हा न्यायालयांनी हस्तक्षेप करून न्यायाची पूर्तता केली. म्हणजेच जनहित याचिका ही केवळ न्यायालयीन प्रक्रिया नव्हती; ती व्यवस्थेच्या उणिवांवर उपाय म्हणून उभी राहिली. मात्र, कोणतेही प्रभावी साधन जसजसे लोकप्रिय होते, तसतसा त्याचा गैरवापर अपरिहार्य ठरतो. जनहित याचिकेचेही तेच झाले. गेल्या काही वर्षांत न्यायालयांनी वारंवार 'पब्लिसिटी इंटरेस्ट लिटिगेशन' हा शब्द वापरून नाराजी व्यक्त केली आहे. काही याचिका या खऱ्या अर्थाने जनहितासाठी नसून, वैयक्तिक प्रसिद्धीसाठी, राजकीय वैरासाठी किंवा प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधण्यासाठी दाखल केल्या जातात. यामुळे दोन स्तरांवर नुकसान होते. एक म्हणजे न्यायालयांचा मौल्यवान वेळ वाया जातो. आधीच प्रलंबित खटल्यांच्या ओझ्याखाली दबलेल्या न्यायव्यवस्थेला अशा याचिका परवडणाऱ्या नाहीत. दुसरे आणि अधिक गंभीर नुकसान म्हणजे न्यायव्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. कारण प्रत्येक निरर्थक याचिका ही खऱ्या गरज असलेल्या प्रकरणांच्या मार्गात अडथळा ठरते. यातूनच काहींची मागणी पुढे येते, जनहित याचिकांवर बंधने आणावीत. वरकरणी ही मागणी रास्त वाटते. पण तिचा अर्थ जर जनहित याचिकेचे दारच बंद करणे असा घेतला, तर तो उपाय नव्हे; तो पराभव ठरेल. कारण मग न्यायव्यवस्था पुन्हा केवळ संसाधनसंपन्न लोकांच्या ताब्यात जाईल. प्रश्न त्यामुळे सरळ आहे: जनहित याचिका टिकवायची की थांबवायची? पण प्रत्यक्षात हा प्रश्नच चुकीचा आहे. खरा प्रश्न आहे, ती कशी वापरायची? कारण साधन दोषी नसते; त्याचा वापर दोषी ठरतो. न्यायालयांनी या संदर्भात काही पावले उचलली आहेत. निराधार याचिकांवर दंड लावणे, याचिकाकर्त्यांच्या हेतूंची कसून चौकशी करणे, यांसारख्या उपाययोजना सुरू आहेत. पण या उपायांची अंमलबजावणी अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असणे गरजेचे आहे. अन्यथा 'जनहित' या शब्दाचीच किंमत कमी होईल. यात माध्यमांची भूमिकाही दुर्लक्षित करता येणार नाही. अनेकदा एखादी याचिका दाखल होताच ती बातमी बनते. याचिकेचा निकाल काहीही असो, याचिकाकर्त्याला प्रसिद्धी मिळतेच. परिणामी, जनहित याचिका ही काहींसाठी 'प्रेस नोट'चा पर्याय बनते. ही प्रवृत्ती रोखली नाही, तर न्यायालये ही न्यायासाठी नव्हे, तर लक्ष वेधण्यासाठी वापरली जाण्याचा धोका आहे. राजकीय पातळीवरही हीच कथा दिसते. संसद किंवा निवडणूक या मार्गाने प्रश्न सोडवण्याऐवजी न्यायालयात जाण्याची सवय वाढते आहे. यामुळे लोकशाही संस्थांचे संतुलन बिघडते. न्यायालय हे शेवटचे व्यासपीठ असायला हवे; पहिले नव्हे. मुळात, जनहित याचिका ही अपवादात्मक उपाययोजना होती. तीच जर नियमित मार्ग बनली, तर तिचे महत्त्व कमी होणे अपरिहार्य आहे. प्रत्येक सार्वजनिक प्रश्न न्यायालयात नेण्याची प्रवृत्ती ही प्रशासनाच्या अपयशाइतकीच नागरिकांच्या अधीरतेचे लक्षण आहे. तरीही, जनहित याचिकेची गरज संपलेली नाही. कारण अजूनही अनेक असे प्रश्न आहेत, ज्यांना आवाज नाही. पर्यावरणीय हानी, कामगारांचे हक्क, प्रशासनातील निष्क्रियता अशा अनेक क्षेत्रांत जनहित याचिका हीच एक प्रभावी साधन ठरते. म्हणूनच उपाय हा 'बंदी'चा नसून 'शिस्ती'चा आहे. न्यायालयांनी कठोर निकष लावावेत, माध्यमांनी संयम पाळावा आणि नागरिकांनी जबाबदारीने ही साधन वापरावी. यांचा समतोल साधला, तरच जनहित याचिका तिचा मूळ हेतू साध्य करू शकेल. जनहित याचिका ही न्यायव्यवस्थेची ताकद आहे की कमकुवतपणा, हे तिच्यावर अवलंबून नाही; ते तिचा वापर करणाऱ्यांवर अवलंबून आहे. ती न्यायासाठी वापरली, तर ती लोकशाहीला बळकटी देते. आणि ती प्रसिद्धीसाठी वापरली, तर ती न्यायालाच संशयाच्या भोवऱ्यात ढकलते. प्रश्न त्यामुळे कायम आहे, आपल्याला न्याय हवा आहे की निव्वळ न्यायाचा देखावा?

# दरवाढीचा विराम की विवेकाचा निर्णय?

**पश्चिम आशियातील युद्धाच्या धक्क्यांनी जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा अस्थिर झाली आहे. ऊर्जा दरवाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढीवरील दबाव या तिघांच्या कात्रीत धोरणकर्ते सापडले आहेत. अशा वेळी व्याजदर वाढवणे की थांबवणे, हा प्रश्न आर्थिक नाही; तर विवेकाचा आहे.**

जागतिक अर्थकारणात संकटे नवीन नाहीत; पण प्रत्येक संकटाची भाषा वेगळी असते. सध्याच्या संकटाची भाषा ही मागणीच्या अतिरेकाची नसून, पुरवठ्याच्या अडथळ्यांची आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे तेलपुरवठा विस्कळीत झाला, समुद्री मार्ग धोक्यात आले आणि ऊर्जा दराने पुन्हा डोके वर काढले. परिणामी महागाई वाढते आहे; पण ही महागाई ग्राहकांच्या उधळपट्टीमुळे नव्हे, तर बाजाराच्या मर्यादांमुळे.

अशा वेळी पारंपरिक अर्थशास्त्र सरसकट लागू करणे हेच मोठे धोरणात्मक अपयश ठरू शकते. महागाई वाढली की व्याजदर वाढवायचे, हा जणू अर्थकारणाचा 'स्वयंसिद्ध' नियम. परंतु प्रत्येक महागाई एकसारखी नसते. पुरवठा-आधारित महागाईवर दरवाढीचा उपाय म्हणजे ताप आलेल्या रुग्णाला थंडीची गोळी देण्यासारखे, क्षणिक दिलासा, पण मूळ आजार तसाच.

याच ठिकाणी व्याजदर 'स्थिर' ठेवण्याचा निर्णय केवळ तांत्रिक राहत नाही; तो धोरणात्मक परिपक्वतेचा कस लावतो. कारण दरवाढ ही केवळ महागाईवर नियंत्रण ठेवत नाही, तर ती वाढीच्या शक्यतांनाही मर्यादा घालते. उद्योग कर्ज घेण्यास कचरतात, गुंतवणूक पुढे ढकलली जाते आणि रोजगारनिर्मितीला फटका बसतो. युद्धामुळे आधीच अस्थिर झालेल्या वातावरणात हा दुहेरी आघात ठरू शकतो.




जागतिक स्तरावर 'स्टॅगफ्लेशन'ची कुजबुज पुन्हा ऐकू येऊ लागली आहे. कमी वाढ आणि जास्त महागाई ही अर्थकारणातील सर्वात अवघड अवस्था. कारण यात धोरणकर्त्यांसमोर 'काय करावे'पेक्षा 'काय टाळावे' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा ठरतो. दरवाढीचा अतिरेक हा त्यातलाच एक धोका.

भारतीय संदर्भात हा पेच अधिकच गुंतागुंतीचा आहे. भारत हा ऊर्जा आयात करणारा देश. त्यामुळे तेलदरवाढ थेट चलनवाढीत झिरपते. पण त्याच वेळी भारताची वाढीची गती हीच त्याची सर्वात मोठी ताकद आहे. अशा वेळी दरवाढ करून महागाई आवरण्याचा प्रयत्न केला, तर वाढीचा वेग मंदावण्याचा धोका स्पष्ट आहे. म्हणूनच भारतीय मध्यवर्ती बँकेसमोरचा प्रश्न केवळ 'महागाई किती?' हा नसून 'महागाईचे स्वरूप काय?' हा आहे. जर ती तात्पुरती, बाह्य घटकांमुळे निर्माण झालेली असेल, तर दरवाढीचा अतिरेकी वापर टाळणेच शहाणपणाचे ठरेल. अन्यथा आपण स्वतःच वाढीच्या इंजिनाला ब्रेक लावण्याचा उद्योग करू.

धोरणनिर्मितीत 'सिग्नल' हा शब्द महत्त्वाचा असतो. व्याजदर स्थिर ठेवणे म्हणजे काहीच न करणे नव्हे; तो बाजाराला दिलेला संदेश असतो— आम्ही घाबरलेलो नाही, पण बेफिकीरही नाही. ही भूमिका जपणे सोपे नसते. कारण बाजाराला त्वरित कृती आवडते; संयम हा त्याला अनेकदा संशयास्पद वाटतो.

युद्धजन्य परिस्थितीत अर्थकारण हे आकड्यांपेक्षा अपेक्षांवर अधिक चालते. गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास ढासळला, तर आकडे कितीही चांगले असले तरी उपयोग नाही. त्यामुळे दरवाढीचा निर्णय घेताना केवळ महागाईचा दर पाहणे अपुरे आहे; बाजारातील मनःस्थितीही तेवढीच महत्त्वाची ठरते. सरकारकडूनही काही प्रमाणात दिलासा देण्याचे प्रयत्न दिसतात. आवश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात असल्याचे संकेत दिले जात आहेत. पण हे तात्पुरते औषध आहे; दीर्घकालीन उपाय नव्हे. ऊर्जा दरांचा प्रश्न सुटल्याशिवाय महागाईचे खरे स्वरूप बदलणार नाही. यात आणखी एक धोका दडलेला आहे. दरवाढीचा अतिरेक केल्यास अर्थव्यवस्थेतील 'क्रेडिट सायकल' खंडित होऊ शकते. बँका सावध होतात, उद्योग मागे हटतात आणि शेवटी वाढीचा वेगच मंदावतो. म्हणजेच महागाईवर नियंत्रण मिळवण्याच्या नादात वाढीचे नुकसान. म्हणूनच सध्याचा 'दरवाढीला विराम' हा निष्क्रियतेचा नव्हे, तर निवडक कृतीचा भाग आहे. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून घाईघाईने निर्णय न घेणे, हीदेखील एक सक्रिय भूमिका असते. अर्थकारणात कधी कधी 'काहीही न करणे' हेच सर्वात कठीण निर्णय असतो.

अर्थात, हा विराम कायमस्वरूपी नाही. महागाई जर नियंत्रणाबाहेर गेली, तर दरवाढ अपरिहार्य ठरेल. पण आजच्या घडीला पुरवठा-आधारित धक्क्यांना मागणी-आधारित औषध देणे हा अधिक मोठा धोका आहे. अर्थकारण हे केवळ गणित नसते; ते निर्णयांचे मानसशास्त्र असते. आणि त्या मानसशास्त्रात अतिरेकी प्रतिक्रिया नेहमीच महागात पडते. म्हणूनच सध्याचा प्रश्न 'दर वाढवायचे का?' हा नसून 'आता वाढवणे योग्य आहे का?' हा आहे. या प्रश्नाचे उत्तर आकड्यांत नाही; ते विवेकात आहे. आणि तो विवेक दाखवणे हीच आजच्या धोरणकर्त्यांची खरी परीक्षा आहे.

## नद्यांत सांडपाणी सोडणाऱ्या उद्योगांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** खासगी संस्था व उद्योगांकडून सांडपाणी प्रक्रिया न करता ते थेट नदीपात्रात सोडण्याचे प्रकार वाढल्याने जलप्रदूषण गंभीर बनले आहे. यापुढे अशा उद्योगांवर केवळ नोटीस न देता थेट व कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा राज्याच्या पर्यावरण व वातावरण बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला.

आकुर्डी येथील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) मुख्यालयात शुक्रवारी झालेल्या विशेष बैठकीत त्या बोलत होत्या. त्यापूर्वी त्यांनी तळवडे येथील रॉ वॉटर पंपिंग स्टेशन, इंद्रायणी नदीची स्थिती तसेच रावेत येथील पंपिंग स्टेशन आणि पवना नदीतील प्रदूषणाची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. अनेक उद्योगांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारले असले तरी योग्य देखभाल नसल्यामुळे ते बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. ही बाब गंभीर असल्याचे सांगत, 'एसटीपी' कार्यरत ठेवणे बंधनकारक करण्याचे निर्देश त्यांनी दिले. बैठकीत पीएमआरडीए व पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून इंद्रायणी, पवना आणि मुळा-मुठा नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे सादरीकरण करण्यात आले. "नदी सुशोभीकरणापेक्षा प्रथम ती प्रदूषणमुक्त करणे महत्त्वाचे," अशी स्पष्ट भूमिका मुंडे यांनी मांडली.




स्थानिक स्वराज्य संस्था तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकांना नदीपात्रातील अतिक्रमणे तातडीने हटविण्याचे निर्देश देण्यात आले. प्रत्येक गृहनिर्माण सोसायटीसाठी 'एसटीपी' सक्तीचा करावा, तसेच परिसरातील सर्व नाले 'एसटीपी'ला जोडून केवळ प्रक्रिया केलेलेच पाणी नदीत सोडले जाईल, याची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सांगितले.

दरम्यान, राज्यातील वाढते जलप्रदूषण रोखण्यासाठी स्वतंत्र 'नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण' स्थापन करण्याचा निर्णय अंतिम टप्प्यात असून, लवकरच त्याची अंमलबजावणी होणार असल्याची माहिती देण्यात आली. या बैठकीस आमदार उमा खापरे, आमदार शंकर जगताप, महापौर रवी लांडगे, तसेच पीएमआरडीए, महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पुण्यात पाणीटंचाईचे संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वाढत्या पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी पुणे महापालिका कठोर निर्णयाच्या तयारीत असून, शहरासाठी दोन पर्याय पुढे आले आहेत. त्यानुसार आठवड्यातून एक दिवस संपूर्ण पाणीबंदी किंवा एकाआड दिवशी पाणीपुरवठा लागू करण्याचा विचार सुरू आहे.

महापालिकेकडून करण्यात आलेल्या प्राथमिक आढाव्यानुसार, सध्या धरणांतील पाणीसाठा झपाट्याने घटत असून, उन्हाळा वाढत चालल्याने पुढील काही महिन्यांत पाण्याचा ताण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यासाठी प्रशासनाने पर्यायी उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये पहिला पर्याय म्हणजे आठवड्यातून एक दिवस शहरात पूर्णपणे पाणीपुरवठा बंद ठेवणे. दुसरा पर्याय म्हणजे एकाआड दिवशी पाणीपुरवठा करणे. या दोन्ही पर्यायांपैकी कोणता पर्याय अमलात आणायचा, यावर लवकरच अंतिम निर्णय होणार असल्याचे संकेत आहेत.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या मते, सध्या शहरातील वाढती लोकसंख्या, पाण्याचा वाढता वापर आणि कमी होत चाललेला साठा यामुळे नियोजनबद्ध पाणीवाटप अत्यावश्यक बनले आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. अशा प्रकारचा निर्णय लागू झाल्यास शहरातील दैनंदिन जीवनावर त्याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

## बंद पथदिव्यांमुळे नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी:** काळेवाडी आणि रहाटणी परिसरात अनेक ठिकाणी पथदिवे बंद किंवा अनुपस्थित असल्याने नागरिकांना रात्री व पहाटे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अंतर्गत रस्त्यांवरील अंधारामुळे अपघातांचा धोका वाढला असून, सुरक्षेचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

पिंपरी पूल ते विजयनगर मार्ग, बीआरटी रस्ता, माने शाळा रस्ता, जोतिबा नगर तसेच तापकीर मळा या भागांत मोठ्या प्रमाणावर पथदिवे बंद असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. अनेक वेळा महापालिकेकडे पाठपुरावा करूनही समस्या कायम असल्याने स्थानिकांमध्ये नाराजी आहे. काही ठिकाणी पथदिवे दुरुस्त करण्यासाठी कर्मचारी येत असले तरी ही कामे तात्पुरतीच ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नियमित देखभाल आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

नदीकाठ आणि अंतर्गत भागात अंधाराचे प्रमाण अधिक असल्याने महिलांच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त होत आहे. काही भागांत गोडाऊन व पत्रा शेड असल्याने रात्रीची परिस्थिती अधिकच धोकादायक बनते, असे स्थानिकांनी सांगितले. मुख्य चौकात काही ठिकाणी पथदिवे दिसतात; मात्र अंतर्गत भागात पूर्ण अंधार आहे. तांबे चौक परिसरात तर अजूनही पथदिव्यांची प्रतीक्षा आहे, असे एका स्थानिक रहिवाशाने सांगितले. महापालिकेने बंद पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी होत आहे.

## बोगस उपसूचनांच्या माध्यमातून निधी वर्ग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आर्थिक कारभारात मोठा धक्का देणारा ५२ कोटी रुपयांचा संशयित घोटाळा उघडकीस आला असून, बोगस उपसूचनांच्या माध्यमातून निधी वळवण्याचा प्रकार समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. देयके प्रत्यक्ष अदा होण्यापूर्वीच हा प्रकार लक्षात आल्याने संबंधित रक्कम रोखण्यात आली आहे.

या प्रकरणात लेखा व वित्त विभागातील प्रक्रियांना बगल देत, आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाईघाईत उपसूचना काढून निधीची तरतूद बदलण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. विशेषतः ३० आणि ३१ मार्च रोजी मोठ्या प्रमाणावर उपसूचना तयार करून, विविध कामांसाठी मंजूर असलेल्या निधीमध्ये फेरफार करण्यात आल्याचा आरोप आहे. या उपसूचनांना ना स्थायी समितीची, ना सर्वसाधारण सभेची मंजुरी होती, ही बाब अधिक धक्कादायक मानली जात आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या प्रकाराची तातडीने दखल घेत, अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती नेमली आहे. समितीला सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून, संपूर्ण आर्थिक व्यवहारांची छाननी केली जाणार आहे. केवळ चालू वर्षापुरतेच नव्हे, तर मागील काही वर्षांतील आर्थिक नोंदीही तपासल्या जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या घोटाळ्याचा केंद्रबिंदू म्हणजे 'उपसूचना' ही यंत्रणा. प्रत्यक्षात, एखाद्या प्रकल्पासाठी मंजूर निधीमध्ये तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे किरकोळ बदल करण्यासाठी उपसूचना काढल्या जातात. मात्र, याच प्रक्रियेचा गैरवापर करून कोट्यवधी रुपयांच्या निधीचे पुनर्विनियोग केल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे 'उपसूचना' प्रणालीतील त्रुटी आणि त्यावर असलेली नियंत्रण यंत्रणा याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

प्रकरण उघडकीस आल्यानंतर संबंधित देयकांवर तातडीने स्थगिती देण्यात आली असून, बँकेलाही पैसे न सोडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निधी प्रत्यक्षात कोणत्या कामांसाठी वळवला जाणार होता, संबंधित कंत्राटदार कोण, आणि या सर्व प्रक्रियेत कोणत्या अधिकाऱ्यांची भूमिका होती, याचा तपास सुरू आहे.

दरम्यान, महापालिकेच्या ठेवी ठेवण्यात येणाऱ्या बँकेच्या बदलाच्या प्रक्रियेवरही संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणाचा पर्दाफाश स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी केल्याचे सांगितले जाते. दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची शक्यता वर्तवली जात आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांसह संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर निलंबन किंवा सक्तीची रजा अशी कारवाई होऊ शकते. पालिकेच्या आर्थिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या प्रकरणामुळे नागरिकांमध्येही संताप व्यक्त होत आहे.

## ओळखीच्या व्यक्तीकडून कामगाराचे बँक खाते साफ

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** ओळखीच्या व्यक्तीला मोबाईल फोन वापरण्यास दिल्याने एका कामगाराचे बँक खाते रिकामे झाल्याचा धक्कादायक सायबर फसवणुकीचा प्रकार पिंपरीत उघडकीस आला आहे. या प्रकरणाने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, पोलिसांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कामगाराने ओळखीच्या व्यक्तीवर विश्वास ठेवून आपला मोबाईल काही काळासाठी वापरण्यास दिला. याचाच गैरफायदा घेत आरोपींनी मोबाईलमधील बँकिंग माहिती, ॲप्स आणि इतर संवेदनशील तपशील मिळवले. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या खात्यातील रक्कम ऑनलाइन व्यवहारांच्या माध्यमातून काढून घेण्यात आली.

सायबर गुन्हेगारांकडून अशा प्रकारे 'विश्वास' हा प्रमुख हत्यार म्हणून वापरला जात असल्याचे या घटनेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे. अनेकदा मोबाईलमध्ये सेव्ह असलेली बँकिंग ॲप्स, यूपीआय, तसेच ओटीपीसारखी माहिती सहज उपलब्ध होत असल्याने फसवणूक सुलभ होते.

तज्ज्ञांच्या मते, अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये मोबाईलवर अज्ञात ॲप्स इन्स्टॉल करणे, स्क्रीन शेअरिंग किंवा रिमोट ॲक्सेस घेणे यांचा वापर केला जातो. काही प्रकरणांत मोबाईल हाती घेतल्यानंतर काही मिनिटांतच आर्थिक व्यवहार पूर्ण केले जातात.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड परिसरात सायबर फसवणुकीचे प्रकार सातत्याने वाढत असून, मागील वर्षभरात शेकडो गुन्हे नोंद झाले आहेत. अशा गुन्ह्यांतून लाखो रुपयांची फसवणूक होत असल्याने नागरिकांनी अधिक सावध राहणे गरजेचे असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. पोलिसांनी नागरिकांना मोबाईल, ओटीपी, बँकिंग माहिती कोणालाही न देण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, फसवणूक झाल्यास तातडीने सायबर हेल्पलाइन १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### हिंजवडीत ३५ लाखांची फसवणूक

**हिंजवडी :** शेअर मार्केटमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका नोकरदाराची तब्बल ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार हिंजवडीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अद्याप कोणालाही अटक झालेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंकित माधुर (वय ३९, रा. हिंजवडी) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. आरोपी राहुल, मनोज आणि राजेश यांनी मोबाईल फोन व व्हॉट्सअॅपद्वारे फिर्यादीशी संपर्क साधला. स्वतःला स्टॉक ब्रोकिंग कंपनीशी संबंधित असल्याचे भासवून त्यांनी शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळवून देण्याचे आश्वासन दिले. आरोपींनी फिर्यादीकडून डिमॅट खाते उघडून घेतले तसेच आधार व पॅनकार्डची माहिती मिळवली. त्यानंतर विविध बँक खात्यांमध्ये रक्कम जमा करण्यास भाग पाडण्यात आले. दररोज २५ हजार रुपयांचा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत आरोपींनी वेळोवेळी मोठी रक्कम गुंतवायला लावली. आरोपींनी एकूण ३५ लाख ६ हजार ५३९ रुपये हडप केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी संबंधित तिन्ही आरोपींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकीस्वार तरुणीचा मृत्यू

**पुणे :** बावधन येथील चांदणी चौक परिसरात भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या भीषण अपघातात २९ वर्षीय तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना ८ एप्रिल रोजी रात्री सुमारे ११.२० वाजण्याच्या सुमारास घडली. शारदा नागनाथ तुपे (रा. कर्वेनगर, पुणे) या दुचाकीवरून जात असताना त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर दुचाकी रस्त्याच्या दुभाजकावर जाऊन जोरात धडकली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बनावट कागदपत्रांतून १७ लाखांची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** बनावट कागदपत्रे तयार करून विश्वास संपादन करत एका महिलेची तब्बल १७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पिंपरीत उघडकीस आला आहे. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, अद्याप कोणालाही अटक झालेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १५ नोव्हेंबर २०१९ ते १० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत पिंपरीतील सत्याम अपार्टमेंट परिसरात घडली. आरोपींनी सुरुवातीपासूनच संगनमताने कट रचून संबंधित महिलेला विविध आमिषे दाखवत व्यवहार केले. या प्रकरणातील मुख्य आरोपी अरविंद पंडित खरात (वय ५२, रा. विजय पार्क, कामगार नगर, पिंपरी) असून, त्याच्यासोबत एका महिलेचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपींनी बनावट कागदपत्रांच्या आधारे विश्वास संपादन करून टप्प्याटप्प्याने १७ लाख रुपये उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणी फसवणूक व बनावट कागदपत्रांचा वापर केल्याप्रकरणी संबंधित कायद्यांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हा गुन्हा ९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी नोंद करण्यात आला.

दरम्यान, प्रकरणातील आरोपींचा शोध सुरू असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### भिगवणमध्ये भटक्या कुत्र्यांचा हैदोस

**भिगवण :** इंदापूर तालुक्यातील भिगवण येथे भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून, शुक्रवारी (दि. ९) प्रभाग क्रमांक १ मध्ये १२ वर्षीय मुलीवर चार ते पाच कुत्र्यांनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात मुलगी जखमी झाली असून, तिच्यावर भिगवण येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमी मुलीचे नाव धनश्री भोलाराम शेलार असे असून, ती रस्त्याने जात असताना अचानक कुत्र्यांच्या टोळक्याने तिच्यावर झडप घातली. यामध्ये एका कुत्र्याने तिला चावा घेतला. परिसरातील शाळकरी मुले व नागरिकांनी प्रसंगावधान राखत तिला कुत्र्यांच्या तावडीतून वाचवले. भिगवण परिसरात भटक्या कुत्र्यांचा त्रास गंभीर स्वरूपात वाढला असून, आतापर्यंत सुमारे ४२ जणांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची माहिती आहे. येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिकेत लोखंडे यांनीही या घटनांना दुजोरा दिला आहे.

### भुशी धरण परिसरात अतिक्रमणांवर कारवाई

**लोणावळा :** भुशी धरण परिसरात स्थानिकांनी उभारलेल्या हंगामी पर्यटन दुकानांवर रेल्वे प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण कारवाई करत दुकाने हटवली. या कारवाईदरम्यान जेसीबी यंत्राचा वापर करण्यात आला असून, मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. भुशी धरण परिसर रेल्वे प्रशासनाच्या मालकीचा असल्याने येथे कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करण्यास मनाई आहे. मात्र, पावसाळी पर्यटन हंगाम लक्षात घेऊन स्थानिकांनी बांबूच्या शेडच्या स्वरूपात तात्पुरती दुकाने उभारली होती. आज सकाळी रेल्वे प्रशासनाने मनुष्यबळासह जेसीबीच्या साहाय्याने या दुकानांवर कारवाई करत ती जमीनदोस्त केली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रेल्वे पोलिसांसह लोणावळा शहर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. रेल्वे प्रशासनाकडून अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरूच राहणार असल्याचे संकेत आहेत.

### १२ गावांना दिलासा, पाबळ-केंदूर परिसरातील पाणीटंचाई दूर होणार

# शिरूरमध्ये 1100 कोटींची सिंचन योजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शिरूर तालुक्यातील पाबळ-केंदूर परिसरातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रस्तावित सुमारे ११०० कोटी रुपयांच्या सिंचन योजनेला गती मिळाली असून, यामुळे १२ गावांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या संदर्भात पुणे येथील सिंचन भवनात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. बैठकीत प्रकल्पातील अडचणी दूर करून कामे जलदगतीने मार्गी लावण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या महत्त्वाकांक्षी योजनेत पाबळ-केंदूर परिसरातील १२ गावांचा समावेश असून, सुमारे १.१४ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावाला ३० मेपर्यंत मंजुरी मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

प्रकल्पाअंतर्गत सुमारे १००० मिमी व्यासाची पाइपलाइन उभारण्यात येणार असून, लिफ्ट इरिगेशन सिस्टिमद्वारे पाणी पुरवठा केला जाणार आहे. यासाठी बॅरेज आणि जनरल लेआउटचे डिझाइन तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच प्रकल्पासाठी सल्लागार (कन्सल्टंट) नेमण्याची प्रक्रियाही वेगाने राबविण्याचे निर्देश देण्यात आले.

या प्रकल्पाची वेळापत्रकही निश्चित करण्यात आले आहे. मेअखेरपर्यंत लिफ्ट इरिगेशनचे डिझाइन पूर्ण करणे, ३० जूनपर्यंत प्रशासकीय मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणे आणि पाणीपुरवठा प्रणालीचे आराखडे निश्चित करणे, अशी टप्प्याटप्प्याने कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

विशेष म्हणजे, या योजनेत १०० टक्के सौर ऊर्जेचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे. यामुळे ऊर्जा खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक सिंचन व्यवस्था उभी राहणार आहे. या प्रकल्पासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य जयश्री पलांडे आणि शेखर पाचुंदकर यांनी पाठपुरावा केला असून, आमदार राहुल कुल यांच्या प्रयत्नातून ही बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या भागातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होऊन शेतीला तसेच पिण्याच्या पाण्यासाठी दिलासा मिळणार आहे. दीर्घकाळापासून पाण्याच्या समस्येला सामोरे जाणाऱ्या पाबळ-केंदूर परिसरासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## रांजणीतील पूर्वा वाघ ठरली ‘आंबेगाव भूषण’

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी येथील उदयोन्मुख खो-खो खेळाडू पूर्वा विजय वाघ हिची ‘आंबेगाव भूषण’ पुरस्कारासाठी निवड झाली असल्याची माहिती युगप्रवर्तक प्रतिष्ठानचे अध्यक्ष गौतम खरात यांनी दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मंगळवारी (दि. १४) रोजी घोडेगाव येथे आयोजित जाहीर कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात राज्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

पूर्वा वाघ ही ग्रामीण भागातील एक उत्कृष्ट आणि मेहनती खो-खो खेळाडू म्हणून ओळखली जाते. राज्यस्तरीय खो-खो स्पर्धांमध्ये तिने उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल चार सुवर्णपदके तसेच कांस्यपदके पटकावली आहेत. तिच्या या यशामुळे रांजणी गावासह संपूर्ण आंबेगाव तालुक्याचा गौरव वाढला आहे. पूर्वा सध्या जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील रा.प. सबनीस महाविद्यालयात इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. खेळ आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात ती उत्कृष्ट कामगिरी करत असल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दरम्यान, या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल रांजणी ग्रामस्थांनी पूर्वा वाघ हिचे विशेष अभिनंदन केले असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## जुन्नरमध्ये एसआयआर मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** मतदार यादी अचूक व अद्ययावत ठेवण्यासाठी भारत निवडणूक आयोगातर्फे राज्यभर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण मोहिम राबविण्यात येत असून, जुन्नर विधानसभा मतदारसंघातही या मोहिमेला सुरुवात करण्यात आली आहे. भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी आणि मतदार नोंदी अधिक पारदर्शक करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

१९५ जुन्नर विधानसभा मतदारसंघात सुरू झालेल्या या उपक्रमाबाबत मतदार नोंदणी अधिकारी पल्लवी घाटगे, तहसीलदार बाळासाहेब सिरसट आणि मंडलाधिकारी विश्वास शिंदे यांनी माहिती दिली. मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने नव्या डिजिटल प्लॅटफॉर्मचीही सुरूवात केली असून, निवडणूक प्रक्रियेशी संबंधित माहिती आता एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.



या मोहिमेअंतर्गत ‘स्वीप’ अंतर्गत सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रम राबविला जात आहे. त्यानुसार मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सध्या प्रत्येक मतदाराचे नाव सन २००२ च्या मतदार यादीशी जुळवण्याचे (मॅपिंग) काम करत आहेत. यासोबतच मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे, चुकीची माहिती दुरुस्त करण्यावर भर दिला जात आहे.

मतदारांनी आपल्या नावाची पडताळणी करण्यासाठी ईसीआयएनईटी या ॲपचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून २००२ मधील मतदारसंघ क्रमांक, मतदान केंद्र क्रमांक आणि अनुक्रमांक शोधून संबंधित माहिती बीएलओ यांना देणे आवश्यक आहे.

जर एखाद्या मतदाराचे नाव २००२ च्या यादीत आढळले नाही, तर पालक किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे माहिती देऊन मॅपिंग प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. याशिवाय, सन २००२ नंतर मतदार झालेल्यांचे ‘प्रोजेन मॅपिंग’ (वारस नोंद) देखील करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे मतदार यादीचे शुद्धीकरण होऊन बोगस मतदारांची नावे वगळण्यास मदत होणार आहे.

या मोहिमेत ग्रामस्तरावरील विविध यंत्रणांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे. मंडलाधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, रेशन दुकानदार तसेच राजकीय पक्षांचे बूथ लेव्हल एजंट (बीएलए) यांनी बीएलओ यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व छायाचित्रे वेळेत उपलब्ध करून देऊन या मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अवसरी खुर्दमध्ये श्री काळभैरवनाथ यात्रा उत्साहात

### डीजे-गुलालविरहित मिरवणुकीचे स्वागत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी खुर्द येथे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिर अवसरी खुर्द यात्रेनिमित्त पारंपरिक वातावरणात आणि शिस्तबद्ध पद्धतीने कार्यक्रमांची सुरुवात झाली. यंदाच्या यात्रेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे डीजे, गुलाल आणि भंडारा विरहित मिरवणूक काढण्यात आल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

शुक्रवारी पहाटे श्रींचा अभिषेक व महाआरती पार पडली. त्यानंतर भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेत जथ्यांनुसार फळांची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत तब्बल चार ते पाच दशकांनंतर प्रथमच बारामती, पुणे व भोसरी येथील बँड पथके, झांज पथके, ढोल-लेझीम पथके तसेच आळंदी येथील वारकरी सहभागी झाले होते. पारंपरिक



वाद्यांच्या निनादात आणि भक्तीमय वातावरणात मिरवणूक पार पडली. यात्रेनिमित्त सकाळी दहा ते बारा या वेळेत ह.भ.प. मधुकर महाराज गायकवाड यांचे ‘देव जन्म’ विषयावर कीर्तन झाले. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी कीर्तनाचा लाभ घेतला.

अवसरी खुर्द येथील श्री काळभैरवनाथ देवस्थान हे जागृत देवस्थान मानले जाते. पुणे, मुंबईसह विविध भागांतून भाविक येथे येऊन कोणतेही शुभ कार्य करण्यापूर्वी देवाचा कौल घेतात. देवाने ‘उजवी’ दिल्यानंतरच कार्यास प्रारंभ करण्याची परंपरा आजही पाळली जाते.

यंदा देवस्थान ट्रस्टतर्फे विविध पारंपरिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी तीन ते सात या वेळेत बैलगाडा शर्यती रंगल्या, तर कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचेही नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे गेली १५ ते २० वर्षे बंद असलेला तमाशा यंदा पुन्हा आयोजित करण्यात आला आहे.

गावातून निघालेल्या भव्य मिरवणुकीला वाड्या-वस्त्यांमधील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

शांत, पारंपरिक आणि प्रदूषणमुक्त पद्धतीने मिरवणूक पार पडल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त करत, पुढील काळातही डीजे, गुलाल व भंडारा विरहितच मिरवणुका आयोजित कराव्यात, अशी भावना व्यक्त केली.

## आळे येथील रेडा समाधी यात्रा आजपासून

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या यात्रांपैकी एक मानली जाणारी रेडा समाधी यात्रा आज, रविवार (दि. १२) पासून आळे येथे सुरू होत असून, बुधवार (दि. १५) रोजी यात्रेची सांगता होणार आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थान आळे येथे भरविण्यात येणाऱ्या या यात्रेला राज्यभरातून भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित आहे.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर देवस्थानतर्फे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. देवस्थानचे अध्यक्ष अविनाश कुऱ्हाडे, उपाध्यक्ष संदीप पाडेकर, सचिव जीवन शिंदे, खजिनदार संजय गुंजाळ आणि यात्रा समितीचे अध्यक्ष गणेश शेळके यांनी संयुक्तपणे याबाबत माहिती दिली. चैत्र वद्य दशमी, रविवारी श्रींचा अभिषेक होऊन यात्रेला सुरुवात होणार आहे. दुपारी १२ ते सायंकाळी ६ या वेळेत भजन महोत्सव आयोजित



करण्यात आला आहे. सोमवारी चैत्र वद्य एकादशी निमित्त पहाटे ५ वाजता तहसीलदार डॉ. बाळासाहेब शिरसाथ यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडणार आहे. दुपारी १२ ते ५ या वेळेत पालखी सोहळा होईल. सायंकाळी ८ वाजता ह.भ.प. पांडुरंग महाराज घुले यांचे कीर्तन होणार असून, रात्री ११ ते पहाटे ५ पर्यंत तुकाईमाता विठ्ठल भक्त प्रासादिक भजनी-भारूड मंडळ, राजुरी यांचा कार्यक्रम रंगणार आहे. मंगळवारी सकाळी महापूजा पार पडणार आहे. संतवाडी, कोळवाडी आणि डावखरवाडी ग्रामस्थांतर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ४ ते ८ या वेळेत कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार आहे. रात्री ८ वाजता ह.भ.प. विशाल महाराज हाडवळे यांचे कीर्तन होणार आहे. बुधवारी ह.भ.प. सुदाम महाराज बनकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने यात्रेची सांगता होणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी वेद बोलविलेल्या ‘रेडा समाधी’च्या परंपरेमुळे या यात्रेला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षी हजारो भाविक येथे दर्शनासाठी हजेरी लावतात. यंदाही मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होण्याची शक्यता असून, प्रशासनाने आवश्यक ती तयारी केली आहे.

## भीमाशंकर येथे मुखदर्शनाची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** भीमाशंकर मंदिर येथे सुरू असलेल्या विकासकामांमुळे मंदिर बंद ठेवण्याचा कालावधी वाढविण्यात आल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. किमान ‘मुखदर्शन’ तरी सुरू करावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांची वाढती गर्दी, सुरक्षिततेचे मुद्दे आणि जून महिन्यातील संभाव्य मुसळधार पाऊस लक्षात घेऊन ९ जानेवारी ते ९ एप्रिल या कालावधीत मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, नियोजित विकासकामे अद्याप अपूर्ण असल्याने हा कालावधी वाढवून ३१ मेपर्यंत मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला आहे. मंदिरातील सभामंडपाचे सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून घुमटाचे काम सुरू आहे, त्यामुळे दर्शन बंद आहे.

## उदापूरचा ‘गाडीबगाड’ थरार; हजारोंची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील उदापूर येथे भरलेल्या ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिर उदापूर आणि ग्रामदेवता मुक्तदेवी यात्रेत पारंपरिक ‘गाडीबगाड’ पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली. “सदानंदाचा येळकोट, भैरवनाथाचे चांगभलं”च्या गजरात भंडारा व खोबऱ्याची उधळण करत हा थरारक सोहळा पार पडला. चैत्र वद्य कालाष्टमी निमित्त होणारी ही यात्रा राज्यात प्रसिद्ध आहे.

ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष संजय शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हनुमान जन्मोत्सवाच्या आठवडाभर आधी बगाडासाठी लागणारी लाकडे आणि अंबाडीच्या नाड्या पुष्पावती नदीत भिजत ठेवण्याची परंपरा आहे. या नाड्या तयार करण्याचे कौशल्य थोरले शिंदे पाटील घराण्याकडे असल्याचे सांगण्यात आले. यात्रेच्या दिवशी पहाटे पाच वाजता अभिषेक



व महाआरतीने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर मांडव डहाळे, प्रतिमा मिरवणूक व शेरणी वाटप झाले. दुपारी तीन वाजता ‘गाडीबगाड’ फिरविण्याचा मुख्य सोहळा सुरू झाला. युद्धरूपी रथावर सुमारे २१ फूट उंच सुळका उभारून त्याला ३१ फूट लांबीचा दंडगोलाकार आढा जोडण्यात आला होता. या आढ्याच्या एका टोकाला झोक्यावर भगत बसतो, तर दुसऱ्या टोकाला दोरीच्या साह्याने भाविक जथ्याने बगाड फिरवतात. यंदा चार बैलांच्या मानाच्या जोडीनिशी ही मिरवणूक हनुमान मंदिर परिसरातून गावात दाखल झाली. मुख्य चौकात बगाड फिरताना जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. गावातील प्रत्येक समाजाला बगाड फिरविण्याची संधी मिळावी यासाठी जथ्यांनुसार वेळ देण्यात आला होता. सायंकाळी साडेसहा वाजता बगाड पुष्पावती नदीपल्याड भैरवनाथ मंदिराजवळ पोहोचला. भगत सुनिल शिंदे यांनी आरती केल्यानंतर भाविकांनी खंडोबाच्या जयघोषात तळी-भंडार अर्पण केले. मंदिराच्या सज्जातून प्रसाद म्हणून खोबऱ्याची उधळण करण्यात आली. यानंतर सायंकाळी छबिना व पालखी मिरवणूक उत्साहात पार पडली. रात्री शोभेचे दारूकाम आणि लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंपरा, श्रद्धा आणि थरार यांचा संगम असलेला उदापूरचा ‘गाडीबगाड’ सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला असून, भाविकांनी या अनोख्या परंपरेचा अनुभव घेतला.

### पाईट येथे शासन आपल्या दारी उपक्रमाला प्रतिसाद

# महाराजस्व समाधान शिबिरात योजनांचा वर्षाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** ‘शासन आपल्या दारी’ या संकल्पनेतून खेड तालुक्यातील पाईट येथे आयोजित ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा’त विविध शासकीय योजनांचा मोठ्या प्रमाणावर लाभ नागरिकांना देण्यात आला. करंजविहिरे व पाईट मंडळातील गावांच्या संयुक्त शिबिरात महसूल विभागासह अनेक शासकीय विभागांचे स्टॉल उभारून सेवा थेट



नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या.

सोमनाथ मंगल कार्यालय, पाईट येथे झालेल्या या शिबिराचे आयोजन प्रांत अधिकारी अनिल दौंडे आणि तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. शिबिरात पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून विविध योजनांचा लाभ घेतला. या शिबिरात महसूल विभागाच्या सेवांना विशेष प्रतिसाद मिळाला.शैक्षणिक व प्रशासकीय कामांसाठी आवश्यक असलेले विविध दाखलेही मोठ्या प्रमाणावर देण्यात आले. एकूण ११२ डोमिसाईल सर्टिफिकेट, २७९ उत्पन्न दाखले आणि पाच रहिवासी दाखले असे एकूण ५४४ दाखले मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. याशिवाय ५५ नवीन अर्ज स्वीकारण्यात आले. या शिबिरात आधार कार्ड अपडेटसाठी ३४ लाभार्थ्यांची नोंद करण्यात आली. महिला व बालविकास विभागाकडून विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या शिबिराचे अध्यक्षस्थान आमदार बाबाजी काळे यांनी भूषविले. त्यांनी शासनाच्या योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच इतर महसूली मंडळांतील नागरिकांनाही अशा शिबिरांद्वारे अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास पंचायत समिती सभापती विद्याताई मोहिते, जिल्हा परिषद सदस्या सुनिताताई बुट्टे पाटील, तहसीलदार प्रशांत बेडसे, नायब तहसीलदार राम बिजे, निवडणूक नायब तहसीलदार मनीषा खैरे, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी प्रतिभा कसबे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणेश गोपाळे यांनी केले.

## मेंढपाळांकडून शेळ्या-मेंढ्यांसाठी कांदापातीची साठवण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या कांदा काढणीची कामे वेगात सुरू आहेत. काढणी झालेल्या शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात कांद्याची पात उपलब्ध होत असून, हीच पात सध्या चारा टंचाईच्या काळात शेळ्या-मेंढ्यांसाठी उपयोगी ठरत आहे.

परंपरेने मेंढपालन व्यवसाय करणारे धनगर समाजातील मेंढपाळ या संधीचा योग्य फायदा घेत आहेत. कांदा काढणी झालेल्या शेतांमध्ये जाऊन ते मोठ्या प्रमाणात कांदापात गोळा करत आहेत. ही पात बैलगाडी व ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाहून नेऊन सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवली



जात आहे. सध्या हिरवी असलेली कांदापात शेळ्या-मेंढ्या आवडीने खात आहेत. विशेष म्हणजे, हीच पात वाळवून साठवली असता पावसाळ्यातील दिवसांत ‘सुकाचारा’ म्हणून अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे भविष्यातील चारा टंचाई लक्षात घेऊन मेंढपाळांकडून नियोजनबद्ध साठवणूक केली जात आहे.

## सारांश वृत्त

### राजस्थानमध्ये गांजाची लागवड

**जयपूर :** राजस्थान अंमली पदार्थ विरोधी कृती दलाने (एएनटीएफ) एकाच दिवसात जिल्ह्यात सात ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात अवैध अंमली पदार्थ जप्त केले आणि सात आरोपींना अटक केली. या युनिटने राजसमंद, बाड़मेर, कोटा, जयपूर आणि प्रतापगड जिल्ह्यात कारवाईदरम्यान ५,८६० गांजाची रोपे नष्ट केली आणि सुमारे १५ किलो गांजा आणि सुमारे ८५ किलो खसखस जप्त केली.

### सायबर फसवणुकीचा दिल्लीत पर्दाफाश

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी ८० लाख रुपयांहून अधिक रकमेच्या डिजिटल अटक आणि गुंतवणूक फसवणूक घोटाळ्याप्रकरणी आंतरराज्यीय सायबर फसवणूक नेटवर्कचा पर्दाफाश केला असून तीन जणांना अटक केली आहे. पहिल्या प्रकरणात, फेब्रुवारीमध्ये ४७.७४ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद झाली होती, जिथे पीडितेला कायद्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी असल्याचे भासवून फसवणूक करण्यात आली होती. आरोपीने पीडितेला डिजिटल अटकेची धमकी दिली आणि पैसे हस्तांतरित करण्यास भाग पाडले. तपासादरम्यान पोलिसांनी उत्तर प्रदेशातील बदायूं येथील एका बँक खात्यात १८.७४ लाख रुपये शोधले.

### पत्रकारांनी आदर्शांचे पालन करावे

**बेंगळूर :** पत्रकारांनी राज्यघटनेच्या आदर्शांचे पालन करत आहोत का, याचा आत्मपरीक्षण केले पाहिजे आणि क्षुल्लक विषयांवर लक्ष केंद्रित करणारी सट्टेबाज पत्रकारिता समाजावर होणाऱ्या परिणामांचा विचार न करता टाळली पाहिजे, असे मत कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शनिवारी व्यक्त केले. कर्नाटक वर्किंग जर्नलिस्ट असोसिएशन आणि बिदर जिल्हा श्रमजीवी पत्रकार संघटना यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेला संबोधित करताना त्यांनी सनसनाटी किंवा सट्टेबाजीचे वार्तांकन धोकादायक ठरू शकते असा इशारा दिला. तसेच तारतम्य बाळगण्याचे आवाहनही केले.

## पंतप्रधान मोदी यांचे सीएएला गती देण्याचे आश्वासन

# तुष्टीकरण संपवण्यासाठीच समान नागरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता/पूर्व बर्धमान :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकत्व दुरुस्ती कायदा (सीएए) लागू करण्यास गती देण्याचा निर्धार व्यक्त करत समान नागरी कायदा (यूसीसी) लागू करण्याचे आश्वासन दिले. पूर्व बर्धमान जिल्ह्यातील कटवा येथे झालेल्या जाहीर सभेत त्यांनी हे वक्तव्य केले.

सभेत बोलताना मोदी यांनी मतुआ, नामशूद्र आणि इतर निर्वासित समुदायांना उद्देशून सांगितले की, त्यांचे नागरिकत्व संविधान आणि सीएएद्वारे संरक्षित राहील. "तुम्ही कोणत्याही राजकीय पक्षाच्या कृपेवर नाही, तर संविधानाच्या संरक्षणाखाली येथे आहात," असे ते म्हणाले.

भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर सीएए अंतर्गत निर्वासितांना नागरिकत्व देण्याची प्रक्रिया वेगाने राबवली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. बंगाल भाजपच्या जाहीरनाम्यातही सर्व हिंदू निर्वासितांना नागरिकत्व व पुनर्वसन देण्याचे आश्वासन देण्यात आल्याचा त्यांनी उल्लेख केला.

मोदी यांनी कथित बेकायदेशीर घुसखोरीवरही जोरदार टीका करत कठोर भूमिका मांडली. "जो कोणी भारतात घुसखोरी करेल, त्याला बाहेर काढले जाईल," असा इशारा त्यांनी दिला. तसेच घुसखोरांना मदत करणाऱ्यांवरही कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

तृणमूल काँग्रेसवर निशाणा साधताना मोदी यांनी राज्यात 'भीतीचे वातावरण' निर्माण झाल्याचा आरोप केला. "ही निवडणूक भीती संपवण्याची आहे," असे ते म्हणाले. राज्यातील बदलाची चिन्हे दिसत असून, आगामी निकाल हा परिवर्तनाचा संकेत ठरेल, असा दावा त्यांनी केला. महिलांसाठी दरमहा ३,००० रुपयांचा भत्ता, सरकारी कर्मचाऱ्यांसाठी सातवा वेतन आयोग लागू करणे, तसेच युवकांसाठी संधी वाढविण्याची हमी देत त्यांनी भाजपच्या 'तीन हमी'वर भर दिला.

शेतकऱ्यांसाठी पीएम-किसान योजनेअंतर्गत वार्षिक ९,००० रुपयांचा लाभ देण्याचे आश्वासन देत, केंद्राच्या ६,००० रुपयांबरोबर राज्य सरकारकडून ३,००० रुपये अतिरिक्त देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. आरोग्य क्षेत्रात आयुष्मान भारत योजना तात्काळ लागू करण्याचे आश्वासन देत, "भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेतला जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. याचबरोबर भ्रष्टाचाराविरोधात श्वेतपत्रिका काढण्याचा इशारा देत त्यांनी तृणमूल सरकारवर तीव्र टीका केली. "भ्रष्टाचार करणाऱ्यांना कायद्याने जबाबदार धरले जाईल," असे ते म्हणाले.

पश्चिम बंगालमध्ये 'तुष्टीकरण आणि मतपेढीचे राजकारण' संपवण्यासाठी यूसीसी लागू करण्याचा भाजपचा संकल्प असल्याचेही मोदी यांनी स्पष्ट केले. राज्याची ओळख टिकवण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. सीएए, यूसीसी, घुसखोरी, कल्याणकारी योजना आणि भ्रष्टाचारविरोधी भूमिका या मुद्द्यांवर भर देत मोदी यांनी बंगाल निवडणुकीसाठी जोरदार प्रचार मोहीम राबवली.

## विक्रम मिस्री यांचा युरोप दौरा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री अमेरिकेच्या दौऱ्यानंतर आता युरोप दौऱ्यावर रवाना होत असून, रविवारपासून ते पॅरिस आणि बर्लिन येथे तीन दिवसांच्या महत्त्वपूर्ण भेटी देणार आहेत. या दौऱ्यात द्विपक्षीय सहकार्याबरोबरच जागतिक आणि प्रादेशिक प्रश्नांवर सखोल चर्चा होणार आहे.

अमेरिकेतील तीन दिवसांच्या दौऱ्यात मिस्री यांनी मार्को रुबिओ यांच्यासह ट्रम्प प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. या भेटीत भारत-अमेरिका संबंध, पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती आणि ऊर्जा सुरक्षेवरील परिणाम यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. युरोप दौऱ्यात पॅरिस येथे मिस्री आणि फ्रान्सच्या परराष्ट्र मंत्रालयाचे सरचिटणीस मार्टिन ब्रायन्स यांच्या सह-अध्यक्षतेखाली भारत-फ्रान्स परराष्ट्र कार्यालयीन सल्लामसलत होणार आहे. या चर्चेत संरक्षण, नागरी अणुऊर्जा, अंतराळ संशोधन, सायबर व डिजिटल क्षेत्र, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि लोकांमधील देवाणघेवाण वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. त्यानंतर बर्लिनमध्ये जर्मनीच्या परराष्ट्र कार्यालयाचे सचिव गेझा अँड्रियास फॉन गेअर यांच्यासोबत भारत-जर्मनी सल्लामसलतीचे सह-अध्यक्ष म्हणून मिस्री सहभाग घेणार आहेत. या बैठकीत व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण व सुरक्षा, तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, विकास सहकार्य आणि शिक्षण क्षेत्रातील सहकार्याचा आढावा घेतला जाणार आहे. याशिवाय, परस्पर हिताच्या जागतिक व प्रादेशिक घडामोडींवरही चर्चा होणार असून, विशेषतः पश्चिम आशियातील संकट आणि त्याचा ऊर्जा सुरक्षेवर होणारा परिणाम हा चर्चेचा प्रमुख मुद्दा असणार आहे.

या दौऱ्यात मिस्री पॅरिस आणि बर्लिन येथे इतर वरिष्ठ अधिकारी व मान्यवरांनाही भेटणार असून, भारताचे युरोपियन देशांबरोबरचे धोरणात्मक संबंध अधिक दृढ करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

## तामिळनाडूत विजय याचा निर्णायक प्रचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तमिळगा वेत्री कषगम (टीव्हीके) चे प्रमुख विजय यांनी प्रचाराच्या निर्णायक टप्प्याची घोषणा करत पक्षाच्या 'अंतिम स्प्रिंट'ला सुरुवात केली आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर पुढील दहा दिवसांत तळागाळात पोहोचत प्रचार तीव्र करण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

एक्सवरील संदेशातून विजय यांनी कार्यकर्त्यांना 'कॉम्रेड' संबोधत बूथस्तरावर संघटितपणे काम करण्याचे निर्देश दिले. सकाळ-संध्याकाळ घराघरात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधावा आणि टीव्हीके उमेदवारांना पाठिंबा मिळवावा, असे त्यांनी स्पष्ट केले. पक्ष 'व्हिसल' चिन्हाखाली निवडणूक लढवत असून, हा प्रचार 'पिढीजात बदल' घडविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य व जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांनाही उमेदवारांशी समन्वय साधत एकसंध प्रचारयंत्रणा उभी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घराघरातील संपर्क, बूथ व्यवस्थापन आणि स्थानिक पातळीवरील संघटनबांधणी यावर विशेष भर देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

विजयाबाबत आत्मविश्वास व्यक्त करत विजय म्हणाले की, "विजय निश्चित आहे" आणि तमिळनाडूमध्ये "विजयी मिरवणूक" निघेल. या निवडणुकीतून नव्या लोकशाही युगाची सुरुवात होईल, असा दावा त्यांनी केला.

दरम्यान, २३ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी राज्यात राजकीय वातावरण तापले आहे. सत्ताधारी डीएमके नेतृत्वाखालील आघाडीचा सामना एआयडीएमके नेतृत्वाखालील विरोधकांशी होणार आहे. द्रमुक आघाडीत काँग्रेससह इतर घटक पक्षांचाही समावेश आहे. अभिनेते विजय यांचे राजकारणातील पदार्पण निवडणूक लढतीत महत्त्वाचा घटक ठरत आहे.

## जम्मू-काश्मीरमध्ये 'नशा मुक्त' मोहिमेला प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमध्ये अंमली पदार्थांच्या वाढत्या समस्येच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आजपासून १०० दिवसांची 'नशा मुक्त' मोहीम सुरू केली आहे. गेल्या पाच वर्षांत कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी तब्बल ६८ हजार किलोहून अधिक अंमली पदार्थ जप्त केल्याची धक्कादायक पार्श्वभूमी असताना ही मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेचा औपचारिक शुभारंभ नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते करण्यात आला. जम्मू येथील एमए स्टेडियममधून भव्य पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवत मोहिमेला सुरुवात करण्यात आली. याच धर्तीवर मेच्या पहिल्या आठवड्यात श्रीनगरमध्येही मोठ्या स्तरावरील कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. 'नशा मुक्त' अभियानांतर्गत पुढील १०० दिवस विविध जनजागृती उपक्रम, सार्वजनिक संवाद कार्यक्रम आणि अंमली पदार्थांच्या गैरवापरासह तस्करीविरोधी कारवायांचा समन्वित कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत नागरी समाज, राजकीय पक्ष, शिक्षक, खेळाडू आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा सहभाग अपेक्षित आहे. या निमित्ताने ड्रग्जविरोधी शपथ घेण्यात येणार असून, समाजातील प्रत्येक घटकाने या लढ्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सिन्हा यांनी केले. अंमली पदार्थांच्या वाढत्या वापरामुळे परिस्थिती गंभीर होत असल्याचे त्यांनी नमूद करत, तस्करांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले. सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंदाजानुसार, जम्मू-काश्मीरमध्ये १.३ दशलक्षाहून अधिक प्रौढ नागरिक व्यसनाधीन पदार्थांच्या विळख्यात अडकले आहेत. यामध्ये ओपिओइड प्रकारातील औषधांचा वापर सर्वाधिक असल्याचे समोर आले आहे. प्रशासनाने अंमली पदार्थविरोधी यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. एनडीपीएस कायद्यांतर्गत सीमा सुरक्षा दलासह इतर सुरक्षा यंत्रणांना शोध, जप्ती आणि अटक करण्याचे अधिक अधिकार देण्यात आले आहेत. विशेषतः आंतरराष्ट्रीय सीमांवरून होणाऱ्या तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे.

सीमेपलीकडून ड्रोनद्वारे अंमली पदार्थांची तस्करी करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने, एआय-आधारित देखरेख प्रणाली, रडार, इलेक्ट्रो-ऑप्टिकल सेन्सर्स, नाईट व्हिजन उपकरणे आणि मोशन डिटेक्टर यांसारख्या साधनांनी सुसज्ज निगराणी व्यवस्था उभारण्यात आली आहे.

## महिला आरक्षणावर काँग्रेस नेते शशी थरूर ठाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** नारी शक्ती वंदन अधिनियमातील प्रस्तावित सुधारणांवरून काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद दिसत असतानाच पक्षाचे खासदार शशी थरूर यांनी महिला काँग्रेसच्या शिष्टमंडळाची भेट घेत महिलांसाठी संधी वाढवण्याच्या पक्षाच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाच्या मुद्द्यावर काँग्रेस ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस कार्यकारी समितीने अलीकडेच केंद्र सरकारच्या प्रस्तावित सुधारणांवर औपचारिक आक्षेप घेतला आहे. नवी दिल्लीतील इंदिरा भवन येथे झालेल्या बैठकीत या सुधारणांचा दृष्टिकोन "एकतर्फी आणि अपारदर्शक" असल्याची टीका करण्यात आली. या पार्श्वभूमीवर थरूर यांनी पक्षाची भूमिका स्पष्ट करताना महिला आरक्षणाला ऐतिहासिक पाठिंबा असल्याचे नमूद केले. थरूर यांनी सांगितले की, काँग्रेसने २०१३ मध्ये राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर करून देण्यास पुढाकार घेतला होता. मात्र, सध्याच्या सुधारणांमध्ये परिसीमन प्रक्रियेचा समावेश केल्यास संघराज्यीय संतुलन बिघडू शकते, अशी त्यांनी चिंता व्यक्त केली.

काँग्रेस नेत्यांनी विशेषतः दक्षिण आणि ईशान्येकडील राज्यांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. लोकसंख्येच्या आधारे होणारे परिसीमन हे लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांसाठी नुकसानकारक ठरू शकते, असा त्यांचा युक्तिवाद आहे.

## एसआयआर वादामुळे राजकीय तापमान वाढले

# नंदीग्राममध्ये चुरशीची लढत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नंदीग्राम मतदारसंघ पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. भाजपचे नेते सुवेंदू अधिकारी आणि तृणमूल काँग्रेसचे उमेदवार पबित्रा कार यांच्यातील लढत अधिकच रंगतदार बनली असून, मतदार यादीतून मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणात वगळल्याच्या आरोपांमुळे या मतदारसंघाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

कोलकातास्थित साबर इन्स्टिट्यूटच्या अभ्यासानुसार, नंदीग्राममधील सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेत मुस्लिम मतदारांचे प्रमाण जास्त प्रमाणात वगळले गेले असल्याचे आढळले आहे. मतदारसंघाच्या सुमारे २५ टक्के लोकसंख्या असलेल्या मुस्लिम समुदायातील तब्बल ९५.५ टक्के नावे पुरवणी यादीतून हटवण्यात आल्याचे या विश्लेषणातून समोर आले. याउलट, गैर-मुस्लिम मतदारांपैकी केवळ ४.५ टक्के नावे वगळण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

या संदर्भात साबर इन्स्टिट्यूटचे संचालक साबिर अहमद यांनी या प्रक्रियेत पक्षपातीपणाचा आरोप करत एआय-आधारित साधनांचा वापर करून मतदारांना लक्ष्य केले जात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. मात्र, भाजपच्या स्थानिक नेतृत्वाने हे आरोप फेटाळून लावत, मतदारसंघातील पारंपरिक मतदान पद्धतीवर भर दिला आहे.

राजकीयदृष्ट्या पाहता, नंदीग्राममध्ये गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले आहेत. १७ पैकी ११ ग्रामपंचायती आणि दोन पंचायत समित्यांवर भाजपचे नियंत्रण असल्याने सुवेंदू अधिकारी यांची पकड मजबूत झाल्याचे निरीक्षकांचे मत आहे. २०२१ च्या निवडणुकीत त्यांनी ममता बॅनर्जी यांचा पराभव करत मोठा राजकीय टप्पा गाठला होता. नंदीग्रामचा इतिहासही तितकाच महत्त्वाचा आहे. २००७ मधील भूसंपादन आंदोलनामुळे हा मतदारसंघ देशभर चर्चेत आला होता आणि त्याच आंदोलनाने २०११ मध्ये तृणमूल काँग्रेसला सत्तेवर आणण्यात निर्णायक भूमिका बजावली होती.

यंदाच्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने पबित्रा कार यांना उमेदवारी देत 'भूमिपुत्र विरुद्ध भूमिपुत्र' अशी लढत उभी केली आहे. पक्षाचे वरिष्ठ नेते अभिषेक बॅनर्जी स्वतः या मतदारसंघातील घडामोडींवर लक्ष ठेवून असून, त्यांनी कार्यकर्त्यांना जोरदार प्रचाराचे आवाहन केले आहे. डाव्या पक्षांनीही या लढतीत आपली उपस्थिती राखली आहे. यंदा सीपीआयकडून शांती गिरी यांना उमेदवारी देण्यात आली असली, तरी मुख्य लढत भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातच रंगणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

नंदीग्राममध्ये २३ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यात मतदान होणार असून, या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मतदार यादीवरील वाद, स्थानिक नेतृत्वाचे वर्चस्व आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी यामुळे नंदीग्रामची लढत यंदाच्या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेची ठरणार आहे.

## बिहारमध्ये मुख्यमंत्रीपदाबाबत भाजपचा सस्पेन्स

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये मुख्यमंत्रीपदासाठी भाजप कोणाला पुढे करणार, याबाबतचा सस्पेन्स कायम असताना पक्षाचे केंद्रीय नेतृत्व सावधपणे पावले टाकताना दिसत आहे. केवळ लोकप्रिय चेहरा निवडण्याऐवजी संघटन आणि विचारधारेत सुसंगत, सुशिक्षित व अनुभवी नेत्याची निवड करण्यावर भर दिला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

राज्यातील बदलत्या राजकीय परिस्थितीत, नितीश कुमार यांच्या राज्यसभेवर निवडीनंतर मुख्यमंत्रीपदासाठी अनेक नावे चर्चेत आली आहेत. मात्र, चुकीचा निर्णय घेतल्यास भाजपच्या दीर्घकालीन राजकीय उद्दिष्टांवर परिणाम होऊ शकतो, याची जाणीव पक्ष नेतृत्वाला आहे. बिहारसारख्या राज्यात जातीय समीकरणे अत्यंत महत्त्वाची असल्याने नेतृत्व निवड प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरली आहे. पक्षाच्या राज्य युनिटमध्ये अत्यंत मागासवर्गीय (ईबीसी) समाजातील नेत्याला पुढे करण्याची भावना जोर धरत आहे. असा उमेदवार व्यापक स्वीकारार्ह, वादमुक्त आणि संघटनाशी निष्ठावंत असावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

इच्छुक नेत्यांकडून दिल्ली आणि पाटणा या दोन्ही ठिकाणी जोरदार लॉबिंग सुरू असल्याचे समोर आले आहे. मात्र, केंद्रीय नेतृत्वाने यावर मौन बाळगल्याने अंतिम निर्णयाबाबत उत्सुकता वाढली आहे. अचानक निर्णय घेण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क सुरू आहेत. संभाव्य दावेदारांमध्ये उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, संजीव चौरसिया, विधानसभा अध्यक्ष प्रेम कुमार, उपमुख्यमंत्री विजय कुमार सिन्हा, तसेच श्रेयसी सिंग यांची नावे चर्चेत आहेत. याशिवाय प्रदेशाध्यक्ष दिलीप जयस्वाल आणि यादव मतदारांमध्ये प्रभाव असलेले केंद्रीय मंत्री नित्यानंद राय यांचाही विचार सुरू असल्याचे सांगितले जाते. १० एप्रिल रोजी होणारी भाजपच्या बिहार कोअर कमिटीची बैठक अचानक पुढे ढकलण्यात आल्याने चर्चेला आणखी उधाण आले आहे. आता एनडीएच्या बिहार घटकांची बैठक लवकरच होण्याची शक्यता असून, त्यानंतर भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक घेऊन अंतिम नावावर शिक्कामोर्तब केले जाईल.

## भारतीय जहाजाने होर्मुझ ओलांडले

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यात दोन आठवड्यांच्या तात्पुरत्या युद्धबंदीची घोषणा झाल्यानंतर भारताच्या ध्वजांकित द्रवीकृत पेट्रोलियम गॅस (एलपीजी) टँकरने जग विक्रम होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडली आहे. जहाज ट्रॅकिंग डेटावरून असे दिसून आले आहे की टँकर शुक्रवारी रात्री आणि शनिवारी सकाळी जलमार्गातून गेला आणि दुपारी सामुद्रधुनीच्या पूर्वेस ओमानच्या आखातात पूर्वेकडे जात होता. संघर्षाच्या कालावधीतही भारतीय जहाजे या समुद्रधुनीतून भारतात आली होती.

## गाझियाबादमध्ये २,२०० कोटींचा प्रकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या गाझियाबादमध्ये २,२०० कोटी रुपयांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम आणि एरोसिटी प्रकल्पाला राज्य सरकारने हिरवा कंदील दिला आहे. या निर्णयामुळे पश्चिम उत्तर प्रदेशाला पहिले आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम मिळणार असून, शहराच्या शहरी आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांच्या मते, हा प्रकल्प केवळ क्रीडा सुविधांपुरता मर्यादित न राहता एकात्मिक शहरी विकासाचे मॉडेल ठरणार आहे. यामुळे गाझियाबादला पर्यटन, क्रीडा आणि आधुनिक शहरी जीवनशैलीचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळख मिळेल. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत राजनगर विस्तारातील मोर्टी परिसरात सुमारे ३७ एकर जागेवर ४०० कोटी रुपयांच्या खर्चातून आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम उभारले जाणार आहे. गाझियाबाद विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष नंदकिशोर कलाल यांनी याबाबत माहिती दिली.

स्टेडियमच्या आसपास सुमारे ३८० एकर क्षेत्रावर १,८०० कोटी रुपयांची एरोसिटी टाउनशिप विकसित करण्यात येणार आहे. या टाउनशिपमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा, व्यावसायिक संकुले, निवास व्यवस्था आणि पर्यटनाशी संबंधित प्रकल्पांचा समावेश असेल. या प्रकल्पाचे आणखी एक आकर्षण म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कन्व्हेन्शन सेंटर, जे व्यावसायिक कार्यक्रम, परिषद आणि प्रदर्शनांसाठी महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे.

## 'आर्टेमिस दोन'चे नाट्यमय जलावतरण

# चंद्राभोवतीचा ऐतिहासिक विक्रमी प्रवास संपला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** चंद्राभोवतीचा विक्रमी प्रवास पूर्ण करून आर्टेमिस दोन मोहिमेचा नाट्यमय शेवट पॅसिफिक महासागरातील जलावतरणाने झाला. सुमारे दहा दिवसांचा हा ऐतिहासिक प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण करत अंतराळवीर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले आणि मानवाच्या अंतराळ संशोधनातील एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला.

नासाच्या या मोहिमेला विशेष महत्त्व आहे, कारण जवळपास पन्नास वर्षांनंतर मानवाने पुन्हा एकदा चंद्राभोवती प्रवास केला. अपोलो मोहिमांनंतर प्रथमच अंतराळवीरांनी चंद्राच्या कक्षेत जाऊन त्याच्या दूरच्या, अदृश्य भागाचे निरीक्षण केले. या मोहिमेदरम्यान त्यांनी सुमारे चार लाख किलोमीटरहून अधिक अंतर पार करत अंतराळ प्रवासाचा नवा विक्रम नोंदवला.

या प्रवासात अंतराळवीरांनी चंद्राच्या पृष्ठभागाचे बारकाईने निरीक्षण केले, त्याचे छायाचित्रण केले आणि अंतराळातून दिसणाऱ्या पृथ्वीचे तसेच सूर्यग्रहणाचे विलक्षण दृश्य अनुभवले. वैज्ञानिक दृष्टिकोनातून या निरीक्षणांना मोठे महत्त्व आहे, कारण भविष्यातील मोहिमांसाठी आवश्यक असलेली माहिती यामुळे मिळणार आहे.

मोहिमेचा सर्वात धोकादायक टप्पा म्हणजे पृथ्वीवर पुनरागमनाचा होता. अंतराळयानाने सुमारे २५ हजार मैल प्रति तास वेगाने पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश केला. या वेळी निर्माण होणाऱ्या प्रचंड उष्णतेचा सामना करत यानाने यशस्वीरीत्या आपला मार्ग कायम ठेवला. त्यानंतर पॅराशूट प्रणाली सक्रिय होत वेग नियंत्रित करण्यात आला आणि अखेरीस अचूक नियोजनानुसार समुद्रात जलावतरण करण्यात आले.

या मोहिमेतील क्रूही ऐतिहासिक ठरला. विविध पार्श्वभूमीतील अंतराळवीरांचा समावेश असलेल्या या संघात पहिली महिला, पहिला कृष्णवर्णीय आणि पहिला गैर-अमेरिकन अंतराळवीर अशा महत्त्वाच्या नोंदी झाल्या. त्यामुळे ही मोहीम केवळ वैज्ञानिकच नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाची ठरली.

आर्टेमिस दोन ही प्रत्यक्ष चंद्रावर उतरण्याची मोहीम नव्हती, तर पुढील टप्प्यातील चंद्र मोहिमांसाठी आवश्यक तांत्रिक चाचण्यांची कसोटी होती. या मोहिमेच्या यशामुळे मानवाला पुन्हा चंद्रावर पाठवण्याच्या कार्यक्रमाला मोठी चालना मिळणार असून, भविष्यातील मंगळ मोहिमांसाठीही ही एक महत्त्वाची पायरी मानली जात आहे. या मोहिमेने अंतराळ संशोधनाच्या नव्या पर्वाची सुरुवात केली असून, विज्ञान आणि मानवी जिद्दीचा संगम दाखवणारा हा प्रवास पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.